ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १८ फेब्रुवारी, १९५९ | अंक ७

## विविध माहिती

**भारतांत येणारे परदेशी प्रवासी**— भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांच्या संख्येंत गेल्या सात वर्षांपासून दरसाल १५ ते २० टक्के वाढ होत आहे. १९५७ सालीं ८०,५४४ प्रवाशांनीं भारताला भेट दिली. भारतामधील त्यांचा मुक्काम सरासरीनें २५·३ दिवस होता व तो अधिक होत चालला आहे प्रत्येक प्रवासी भारतांत असतांना दररोज सरासरी ८१·२ रुपये खर्च करतो असा अंदाज आहे.

**बिहारमध्यें संस्कृत विद्यापीठ**— बिहारच्या शिक्षण-मंत्र्यांनीं अशी माहिती दिली आहे कीं, बिहारमध्यें एका संस्कृत विद्यापीठाची स्थापना करण्यांत येणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून तें बहुधा चालू होईल. विद्यापीठाला मदत म्हणून दरभंगाच्या महाराजांनीं आपला राजवाडा व वाचनालय देऊं केलें आहे. वाचनालयांत दुर्मिळ अशीं संस्कृत हस्तलिखितें आहेत.

**न्यूयॉर्क टाइम्सची खास पुरवणी**— भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीं ‘ न्यूयॉर्क टाइम्स ’ ह्या अमेरिकेंतील वृत्तपत्रानें २० पानांची एक खास पुरवणी प्रसिद्ध केली. ह्या पुरवणींत अमेरिकेंतील भारतामधील पुढाऱ्यांनीं भारताचा व्यापार, राजकारण, इत्यादि विषयांवर लेख लिहिले आहेत. सर्व पुरवणीसाठी जाहिरातींच्या दरानें पैसे घेण्यांत आले.

**ओरिसा सरकारकडून तांदुळाची खरेदी**— ओरिसाच्या गरजा भागवून उरणारा सर्व तांदूळ विकत घेण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ओरिसामध्यें चालू हंगामांत सुमारें ४,००,००० टन तांदूळ निर्यात करण्यासाठी उपलब्ध होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. २० लाख टन तांदुळाचा सांठा करण्याच्या सरकारच्या धोरणाचें हें एक अंग आहे.

**मजुराकडून पुलाचें उद्घाटन** — कोलंबो शहर व सीलोन मधील चहाचे मळे ह्यांना जोडणाऱ्या एका पुलाचें उद्घाटन पुलावर काम करणाऱ्या एका मजुराच्या हस्तें करण्यांत आलें. सीलोनचे पंतप्रधान श्री. बंदरनायक ह्यांनीं ऐनवेळीं ह्या मजुराला पुढें बोलाविले व त्याच्याकडून बटन दाबवून रस्त्यावरील अडसर दूर केला. वास्तविक उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्तें व्हावयाचें होतें.

**तांत्रिक शिक्षण देणारी संस्था** — भिलई येथील पोलादाच्या कारखान्यांत काम करणारे तंत्रज्ञ शिकवून तयार करण्यासाठी कारखान्याच्या चालकांनीं एक संस्था काढण्याचें ठरविलें आहे. संस्थेंत १७० कामगारांना प्रवेश दिला जाईल. त्याशिवाय कामगारांना कसबी शिक्षण देण्यासाठी सायंकाळचे वर्ग चालविण्यांत येणार आहेत. वर्गांत कारखान्यांत कामावर असलेले १,००० कामगार शिकूं शकतील.

**उत्तर-प्रदेशांतील साखर कारखाना**— उत्तर-प्रदेशांतील नैनिताल जिल्ह्यांत राज्यांतील साखरेचा पहिला सहकारी कारखाना उभारण्यांत आला आहे. कारखान्यांत साखरेच्या उत्पादनास पुढील महिन्यांत प्रारंभ होईल व रोज १,००० पोतीं साखर तयार होईल. कारखान्यासाठी ४० लाख रुपयांचें भांडवल लागलें आहे.

**झेकोस्लोव्हाकिआ–अरब संघ करार**— संयुक्त अरब संघ आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान तीन वर्षें मुदतीच्या व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या आहेत. करारामधील शर्तींस धरून उभयपक्षीं २। कोटी पौंड किंमतीच्या मालाची देवघेव होईल. अरब संघ झेकोस्लोव्हाकिआकडून यंत्रसामुग्री आयात करील आणि कापूस व इतर कच्चा माल झेक देशाला पुरवील.

**जम्मूमधील खनिज संपत्ति**— जम्मूमधील उत्तर विभागाची भूगर्भशास्त्रीय पहाणी करण्यासाठी भारत सरकारच्या सहा शास्त्रज्ञांची एक तुकडी तिकडे रवाना झाली आहे. हा भाग खनिज संपत्तीच्या दृष्टीनें उत्तर भारतांत सर्वांत अधिक समृद्ध आहे, असें म्हणतात. ह्या भागांत रत्नें, लोखंड, तांबें, इत्यादि खनिजें सांपडण्याची शक्यता आहे.

**तिसऱ्या योजनेसाठी पैसा**— भारत सरकारचे उपअर्थमंत्री श्री. भगत ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी लागणारा पैसा उभारणें बरेंच अवघड जाणार आहे. तुटीचे अर्थसंकल्प अंमलांत आणण्याची शक्यता आजच्या मानानें कमी असेल आणि परदेशी चलनाच्या साठ्यांतून पैसा काढणेंहि कठीण होणार आहे. पण विकासाच्या मतीसाठी पैसा कोठून तरी गोळा करावाच लागेल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सहकार चळवळ आणि हातमाग धंदा

त्यावेळीं अत्यंत बिकट स्थितींत असलेल्या हातमाग धंद्यास आर्थिक साह्य करण्यासाठी सप्टेंबर १९५३ मध्यें हातमाग सेस फंड निर्माण करण्यांत आला. त्याच वेळेस सदर निधीचा कारभार पाहण्यासाठी व या धंद्याचा विकास साधण्यासाठी अ. भा. हातमाग मंडळाची स्थापना करण्यांत आली. केवळ सहकारी संस्थाद्वारेंच या धंद्याचा जम चांगला बसवितां येईल हें लक्षांत घेऊन हातमागी विणकरांच्या सहकारी संस्थांतर्फेच आर्थिक साह्य देण्यांत येऊं लागलें. अशा सहकारी संस्थांच्या अभावीं विणकरांना आणि त्यांच्या कुटुंबियांना त्यांचीं अनेक वर्षे पिळवणूक करणाऱ्या सावकारांच्या किंवा मोठ्या विणकरांच्या दयेवर जगावें लागलें असतें.

### संख्येंत दुपटीनें वाढ

हातमाग धंद्यास आर्थिक साह्य देण्याचा कार्यक्रम सुरू झाल्यापासून सहकारी संस्थांच्या सदस्यांच्या हातमागाची संख्या जवळजवळ दुप्पट झाली आहे. सप्टेंबर १९५३ मध्यें सहकारी संस्थांत हातमागांची संख्या ६,८२,०८३ होती ती जून १९५८ च्या अखेरीस ११,९८,७४६ झाली. ही संख्या देशांत चालू असलेल्या एकूण हातमागांच्या ४० टक्के आहे. देशांत हल्लीं निरनिराळ्या ठिकाणीं मिळून एकूण ९,६०० हातमाग सहकारी संस्था आहेत. त्याचप्रमाणें हातमागी कापडाचें उत्पादनहि वाढत असून, १९५३ मध्यें १२० कोटी वार होतें तें वाढून १९५८ मध्यें १७८ कोटी वार झालें.

भारत सरकारनें हातमाग धंद्याच्या विकासासाठी कर्ज व साह्य म्हणून १९५३–५४ ते १९५७-५८ या पांच आर्थिक वर्षांत २२·२८ कोटी रुपयांवर रक्कम मंजूर केली. या मंजूर रक्कमेपैकी सुमारें २१·४८ कोटी रु. रक्कम आर्थिक साह्य वा कर्ज म्हणून राज्य सरकारांनीं देऊनहि टाकली आहे. १९५८-५९ या चालू आर्थिक वर्षांत आतांपर्यंत कर्ज आणि मदत म्हणून २·४१ कोटी रुपयांवर रक्कम मंजूर केलेली आहे.

### औद्योगिक सहकारी संस्था

सहकार कार्यक्रमासाठी हातमाग विणकरांच्या औद्योगिक सहकारी संस्थांचीहि स्थापना करण्यांत येते. त्या दृष्टीनें विणकर मजुरी करीत असलेल्या पूर्वीच्या कारखान्यांचें सहकारी संस्थांत रूपांतर करण्यांत येतें व विणकर अशा संस्थेचे सभासद बनतात. देशांत अशा प्रकारच्या १७ औद्योगिक सहकारी संस्था असून त्यापैकी मद्रास राज्यांत ७, केरळांत ५, बिहारांत २ व मुंबई, पाँडेचरी व जम्मू या राज्यांत प्रत्येकी १ याप्रमाणें आहेत.

विणकर सदस्य असलेल्या सहकारी कताई (स्पिनिंग) गिरण्या स्थापन करण्यासहि उत्तेजन देण्यांत येतें, इतकेंच नव्हे तर परवानित चात्या देतांना अशा गिरण्यांना खाजगी मालकीच्या गिरण्यांपेक्षा प्राधान्य दिलें जातें. अशा सात गिरण्यांस मंजुरी देण्यांत आलेली असून त्यापैकी एक मुंबई राज्यांतील आहे.

देशांत विणकऱ्यांसाठीं अनेक सहकारी घरबांधणी संस्थांचीहि स्थापना झालेली आहे. जून १९५८ पर्यंत निरनिराळ्या राज्यांत अशा २८ वसाहतीस मंजुरी मिळालेली असून, तेथपर्यंत सुमारें ८३० घरें बांधून झालेलीं होतीं तर आणखी ९२ घरांची बांधणी चालू होती.

### विक्री संघटना

हातमाग कापडाच्या विक्रीचा प्रश्न हाताळण्यांत सहकारी संस्थांनीं महत्त्वपूर्ण कामगिरी बजाविलेली आहे. विक्रीभांडारें, आंतरराज्य भांडारें व मध्यवर्ती भांडारें उघडण्यांत आलेलीं आहेत. देशांतील दूरवरच्या भागांत विक्रीसाठी मोटारी पाठविण्यांत येतात तसेंच हातगाडीवाल्यांमार्फत किरकोळ विक्री केली जाते. देशांत सध्यां सुमारें ४३ मध्यवर्ती, २७ आंतरराज्य आणि १,५९१ विक्रीभांडारें चालू आहेत. याशिवाय ३७ फिरत्या मोटारी, ५१ ट्रॉली व ६० हातगाडीवाले हातमाग कापडाच्या विक्रीकार्यांत गुंतलेले आहेत.

विक्रीचा प्रश्न कांहींसा अवघड असला तरी हातमाग कापडाचें उत्पादन हळूहळू वाढत आहे यावरून त्या कापडाचा खपहि अधिकाधिक होत आहे हेंच दिसून येतें. १९५८ मध्यें कापडगिरण्यांच्या उत्पादनांत कांहींशी घट झाली होती. परंतु हातमागाचें उत्पादन मात्र सुमारें १० कोटी वारांनीं वाढलें होतें.

### निर्यात व्यापार

हातमागी कापडाचा आंतरराज्य व्यापार तसेंच निर्यात व्यापार वाढावा या हेतूनें अखिल भारतीय हातमाग कापड विक्री सहकारी संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेची मुंबई, मद्रास व कलकत्ता येथें भांडारें आहेत. परदेशांत एडन, कोलंबो, सिंगापूर, कौलालंपूर व बँकॉक येथेंहि विक्री भांडारें आहेत.

भारतीय हातमाग कापडाचा परदेशांत प्रचार करून मागण्या मिळविण्यासाठी योग्य केंद्रांत फिरते व्यापारी प्रतिनिधी नेमलेले आहेत. भारताचे परदेशांतील व्यापारी प्रतिनिधी हातमाग कापडाच्या निर्यात वाढीकडे विशेष पुरवितात आणि भारतीय हातमाग कापडाचे विविध नमुने दाखविण्याच्या दृष्टीनें प्रदर्शनें भरविण्यांत येतात. अखिल भारतीय हातमाग मंडळ व स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन यांच्या सहकार्यानें हातमागासाठी निर्यात संघटनाहि स्थापन करण्यांत येत आहेत. तथापि, आपल्या योजनेस लागणाऱ्या कापडाचें देशांतच उत्पादन करण्यास परराष्ट्रें उत्तेजन देतात यासारख्या अनेक गोष्टींवर निर्यात व्यापार अवलंबून असतो हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.

---

**घरासाठी पोलाद मिळणार**—मुंबईचे पुरवठा मंत्रि श्री. काझी ह्यांनीं विलेपार्ले येथें आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या नोकरांसाठी बांधण्यांत यावयाच्या गाळ्यांच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविला. ह्या प्रसंगीं त्यांनीं असें सांगितलें कीं, चालू वर्षाच्या अखेरच्या तिमाहीपासून घरांसाठी अधिक पोलाद मिळूं लागेल.

**दोहद येथें विविधोद्योगी शाळा**—मुंबई सरकारनें दोहद येथें विविध उद्योगांचें शिक्षण देणारी एक शाळा काढण्याचें ठरविलें आहे. शाळा काढण्यासाठी प्रारंभीं १९ लाख रुपये खर्च करावे लागतील. शाळेंत १२० विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची सोय होईल. पंचमहाल जिल्ह्यांतील श्री. कमळाशंकर पंड्या ह्या शिक्षणतज्ज्ञानें ह्या कामीं विशेष पुढाकार घेतला होता.

**श्रीरामपूरजवळील डिस्टिलरी**— श्रीरामपूरजवळील चितळी ह्या गांवीं उसाच्या रसाच्या मळीपासून स्पिरिट व अल्कोहल तयार करण्याची डिस्टिलरी उभारण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याच्या कामाला येत्या एप्रिलपासून प्रारंभ होईल. ह्या भागांतील १० साखर कारखान्यांमधील मळी उपयोगांत आणली जाईल. डिस्टिलरीसाठी २ कोटी रुपये भांडवल लागेल.

# अर्थ

बुधवार, ता. १८ फेब्रुवारी, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानांतील १३५ कोटी रुपयांचें गुप्त धन

पाकिस्तानच्या लष्करी कायद्यावर आधारलेल्या सरकारनें देशांतील दडविलेलें उत्पन्न बाहेर काढण्याच्या हेतूनें गेल्या वर्षीच्या ३ नोव्हेंबरला हुकूम काढला. हुकुमांत असें जाहीर करण्यांत आलें कीं आपलीं उत्पन्नें बरोबर अजमावलीं गेलीं नाहींत असें ज्या लोकांना वाटत असेल त्यांनीं आपण होऊन पुढें यावें आणि चुका दुरुस्त करवून घ्याव्या. दडवलेलीं उत्पन्नें कबूल करण्यास लोकांना आकर्षण वाटावें म्हणून सरकारनें कांहीं सवलती जाहीर केल्या. मोठ्या उत्पन्नावर ५० टक्के प्राप्ती–कर पाकिस्तानांत घेण्यांत येत असे. अशा लोकांनीं दडविलेलें उत्पन्न जाहीर केलें तर त्या उत्पन्नावर ३१ टक्केच कर घेण्यांत येईल असें जाहीर करण्यांत आलें. मात्र त्यांना कराची रक्कम तावडतोब भरावी लागणार होती. ज्या लोकांना कराची रक्कम एक महिन्याच्या आंत भरणें शक्य नसेल त्यांना दडवलेल्या उत्पन्नावर जास्तींत जास्त ३३ टक्के कराचें आकर्षण दाखविण्यांत आलें. जे आपलें खरें उत्पन्न सांगतील पण त्यावरील कर भरण्यास अधिक अवधी मागतील, त्यांना मात्र ३५ टक्के दरानें कर भरावा लागेल असें सांगण्यांत आलें. ३१ डिसेंबर, १९५८ अखेर उत्पन्नाबद्दलच्या कबुल्या द्यावयाच्या होत्या. तथापि, बटहुकमाचा परिणाम तावडतोब झाला नाहीं. सर्व नोव्हेंबर महिन्यांत व डिसेंबरच्या सुरवातीच्या दिवसांत फारशा कबुल्या आल्या नाहींत. शिवाय कबुल्यांमधील रकमाहि फारशा मोठ्या नव्हत्या. पण नंतर मात्र कबुली जबाबाची गर्दी एकदम वाढूं लागली. ३१ डिसेंबरला तर कर-कचेऱ्यांपुढें कबुली जबाब देणाऱ्यांच्या रांगा सर्व देशभर दिसूं लागल्या. टपालानें ७०० लखोटे आले. पाकिस्तानांतील कर-कचेऱ्या त्या दिवशीं मध्यरात्रीपर्यंत दिवे जाळीत होत्या आणि परिणामीं सरकारच्या तिजोरींत ७५ कोटी रुपयांची भर पडली. १०० रुपयांपासून १ कोटी रुपयांपर्यंतचीं दडवलेलीं उत्पन्नें उजेडांत आलीं. पुष्कळ करचुकव्यांनीं आपले हिशोब पुरे झाले नसल्यानें अधिक मुदतीची मागणी केली. त्याप्रमाणें सरकारनें १५ जानेवारीपर्यंत मुदत वाढविली आणि आणखी २५ कोटी रुपये उजेडांत आणले.

सर्व धावपळ संपल्यावर एकूण १३५ कोटी रुपयांचें दडविलेलें उत्पन्न बाहेर आल्याचें दिसून आलें. एकूण ४५,००० अर्जदारांनीं मिळून ८५,००० अर्ज सरकारकडे केलेले आढळले. ह्या अर्जांत गेल्या पांच वर्षांत दडविलेलीं उत्पन्नें कबूल करण्यांत आलीं होतीं. पाकिस्तान सरकारच्या अंदाजाप्रमाणें देशांत फक्त ८०,००० लोकांना प्राप्तीवरील कर भरण्यासारखें मोठें उत्पन्न होतें. पण, ह्या लोकांत कबुलीजबाबांमुळें आणखी २०,००० लोकांची भर पडली. सरकारनें दडविलेलें उत्पन्न उजेडांत आणण्यासाठीं जो हुकूम काढला त्यामुळें तिजोरींत अनपेक्षित भर पडलीच. पण त्याशिवाय करपद्धतीवरहि परिणाम झाला. कराची आकारणी करण्याची एक नवी पद्धत सरकारला सांपडली व तीमुळें अधिक करपात्र लोक यादींत आले. कर चुकविणारे लोक एकदम प्रामाणिक झाल्यामुळें कर कसे चुकवावे ह्याबाबत सल्ला देणाऱ्या सल्लागारांची जरूर नाहींशी झाली. त्याचप्रमाणें, करपात्र नागरीक आणि कराची आकारणी करणारे अधिकारी ह्यामधील संबंध सुधारले. ह्यासंबंधीं बोलतांना एक पाकिस्तानी अधिकारी म्हणाला कीं, शत्रूला त्यांच्या गुप्त कागदपत्रासह पकडण्यासारखाच हा प्रकार होता. लष्करी हुकुमामुळें किती उत्पन्न दडविलें होतें तें तर कळलेंच. पण तें कोणत्या युक्त्यांनीं दडविण्यांत आले होतें ह्याचीहि माहिती सरकारला मिळाली. त्यामुळें पाकिस्तानांतील करपात्र लोकांना ह्यापुढें उत्पन्न दडविणें अशक्य होईल आणि ते कर चुकविण्याचें पातक करणार नाहींत.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें

अहवालाचे वर्षी सर्व खर्च भागवून, नोकरवर्गास बोनस देण्यासाठी रु. १,१०,००० ची तरतूद करून व इतर नित्याच्या व आवश्यक त्या तरतुदी करून बँकेस तिच्या व्यवहारांत नक्त नफा रु. ५,५६,४३५–९२ इतका झाला. चालू वर्षीचे नफ्याचे या रकमेंतून गंगाजळी रु. १,५०,००० व १९५८ सालचे करांसाठी तरतूद रु. २,५०,००० = रु. ४,००,०००–०० याप्रमाणें रकमा वर्ग केल्यावर रु. १,५६,४३५–९२ इतकी रक्कम शिल्लक राहते. यांत गेल्या वर्षीतून पुढें ओढलेली नफ्याची बाकी रु. ३६,०९७–८३ मिळविल्यावर एकूण रु. १,९२,५३३–७५ इतकी रक्कम वांटण्याकरितां उपलब्ध राहते. या रकमेची वांटणी खालीलप्रमाणें व्हावी अशी संचालकांची शिफारस आहे :– दिनांक ३१ डिसेंबर, १९५८ ला पूर्ण होणाऱ्या वर्षासाठी ६४,००० भागांवर वसूल रकमेवर द. सा. द. शें. ६॥ टक्केप्रमाणें प्रमाणत: करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी रु. १,५३,१९४–५३. रु. ३९,३३९–२२ ही रक्कम पुढील वर्षीच्या हिशेबांत ओढली जाईल.

अहवालाचे वर्षी बँकेच्या कारभारांत समाधानकारक प्रगति झाली असल्याचें दिसून येतें. सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढविण्यांत आली असून, एकंदर गुंतवणुकीची बाजारभावानें होणारी किंमत ही खरेदीचे किंमतीपेक्षा जास्त असल्याचें दिसून येईल. अहवालाचे वर्षअखेर भागांवर तीन कॉल मागविण्यांत आले आहेत. राहिलेले दोन कॉल चालू वर्षी म्हणजे १९५९ मध्यें भरावयाचे आहेत. अहवालाचे वर्षाचे अखेरीस वसूल भांडवल रु. २५,२२,३४० इतकें झालें आहे व गंगाजळी, १९५८ सालचे नफ्यांतून वर्ग केलेली रक्कम धरून, रु. १३,००,००० इतकी झाली आहे. बँकेचे भाग आतां मुंबई येथील स्टॉक एक्स्चेंजवर ठेवले असून त्यांचा अधिकृत बाजारभाव प्रसिद्ध होत असतो.

१९५८ मध्यें पुणें येथें तीन उपशाखा, मुंबई येथें दोन उपशाखा व परळी वैजनाथ ( मराठवाडा ) येथें एक शाखा अशा एकूण सहा शाखा उघडण्यांत आल्या. या नवीन शाखा धरून बँकेच्या एकूण ४४ शाखा झाल्या असून सर्व शाखांचे व्यवहार समाधानकारकपणें चालू आहेत.

## डायरेक्टर पद असाइन करतां येत नाहीं

### मुंबई हायकोर्टाचा महत्त्वाचा निवाडा

१९५६ च्या कंपनी कायद्याच्या ३१२ व्या कलमाचे अर्थाविषयीं एक महत्त्वाचा निर्णय मुंबई हायकोर्टानें नुकताच दिला आहे.

दादोबा काशिनाथ ठाकूर हे ओरिएंट मेटल प्रेसिंग वर्क्स (प्रायव्हेट) लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर होते. दादोबा आणि कंपनी ह्यांचेमध्यें ७ जुलै, १९५५ मध्यें झालेल्या करारान्वयें आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या १०९ (ब) कलमान्वयें दादोबांना त्यांच्या जागीं कोणाचीहि मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून जिवंतपणीं कागद करून किंवा मृत्युपत्र करून नमणूक करण्याचा अधिकार दिलेला होता. दादोबांनीं मृत्युपत्र करून आपला मुलगा, गोविंद, ह्यास कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर स्वतःच्या मृत्यूचे तारखेपासून नेमलें. दादोबांच्या हयातींत गोविंद हा कंपनीचा डायरेक्टर होता. दादोबांचा भाऊ, भास्कर, हाहि डायरेक्टर होता.

दादोबांच्या मृत्यूनंतर गोविंदनें मॅनेजिंग डायरेक्टराची जागा घेतली आणि दरमहा ३,५०० रु. पगार घेऊं लागला. भास्करनें ह्या नेमणुकीस हरकत घेऊन मुंबईच्या सिटी सिव्हिल कोर्टांत दावा टाकला. "नवा कंपनी कायदा अंमलांत आणल्यानंतर कोणत्याहि डायरेक्टरानें आपली जागा असाइन केली, तर ती रद्द होईल" असें नव्या कायद्याचें ३१२ वें कलम सांगतें, त्यावर गोविंदचा दावा आधारलेला होता.

#### हायकोर्टापुढील मुख्य मुद्दे

सिटी सिव्हिल कोर्टानें ३१२ व्या कलमाप्रमाणें गोविंदची नेमणूक बाद ठरविली. गोविंदनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें. अपिलांत दोन मुद्दे चर्चिले गेले. (१) असाइनमेंटला केलेली बंदी जिवंतपणीं केलेल्या असाइनमेंटला लागू आहे; मृत्युपत्राच्या अन्वयें एखाद्याची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमणूक करण्यास ३१२ व्या कलमानें प्रतिबंध केलेला नाहीं. (२) दुसरा मुद्दा असा, कीं ३१२ वें कलम डायरेक्टरांच्या जागेच्या असाइन्मेंटलाच फक्त लागू आहे; मॅनेजिंग डायरेक्टरच्या जागेला लागू नाहीं.

न्यायमूर्ति एस. टी. देसाई व न्यायमूर्ति के. टी. देसाई ह्यांनीं अपील ऐकलें, पण त्यांच्यांत मतभेद झाला. न्या. एस. टी. देसाईंच्या मतें, मॅनेजिंग डायरेक्टरच्या जागेलाहि असाइन्मेंटची बंदी लागू आहे, आणि असाइनमेंट जिवंतपणीं केलेली असली किंवा मृत्युपत्रानें केलेली असली तरी दोन्ही बाबतींत बंदी आहे. न्या. के. टी. देसाईंचें त्याविरुद्ध मत पडलें. तेव्हां न्यायमूर्ति मुधोळकर ह्यांचेकडे हा प्रश्न सोपविण्यांत आला आणि त्यांनीं न्या. एस. टी. देसाई ह्यांच्या मतास पुष्टी दिली.

#### न्या. मुधोळकरांचा निर्णायक अभिप्राय

एका डायरेक्टरनें आपलें संचालकत्व दुसऱ्यास वर्ग करण्यास बंदी असावी असा ३१२ व्या कलमाचा अभिप्रेत उद्देश दिसतो. तेव्हां, त्या उद्देशाला अर्धवट पोषक होईल एवढाच त्याचा अर्थ लावणें चुकीचें होईल. जिवंतपणीं केलेलें हस्तांतरच फक्त निषिद्ध आहे; मृत्युपत्रान्वयें केलेलें निषिद्ध नाहीं, असें मानणें चुकीचें होईल. म्हणून, असाइनमेंटमध्यें जिवंतपणीं किंवा मृत्युपत्रानेंहि केलेली नेमणूक समाविष्ट आहे. जी बंदी डायरेक्टरपदाला लागू आहे, ती मॅनेजिंग डायरेक्टर पदालाहि असावयासच हवी. म्हणून, दादोबांना करारानें व आर्टिकल्स ऑफ असोसिएशननें दिलेला अधिकार ३१२ व्या कलमाशीं विसंगत, म्हणून रद्द समजला पाहिजे.

## रेल्वे नोकरवर्गाच्या ग्राहक सहकारी संस्था

### पश्चिम रेल्वे आघाडीवर

भारतांत प्रत्येक २० रेल्वेकामगारांपैकी एक जण ग्राहक सहकारी संस्थेचा सदस्य असतो, असें भारतीय रेल्वेच्या सहकारी संस्थांच्या जून, १९५८ ला संपलेल्या सहामाहीमधील कामकाजाच्या अहवालावरून दिसून येतें.

जून अखेरीस रेल्वे नोकरवर्गाच्या १२१ ग्राहक सहकारी संस्था काम करीत होत्या व त्यांचे एकूण ५८,३३८ सभासद होते. पश्चिम रेल्वेवर सर्वांत जास्त सहकारी संस्था आहेत. तथापि, दक्षिण रेल्वेवरील अशा संस्थांतील सदस्यांची संख्या सर्वांत अधिक म्हणजे सबंध देशांतील सदस्यांच्या जवळजवळ १/५ इतकी आहे. पश्चिम व मध्य रेल्वेचा क्रम त्यानंतर असून त्यांची सदस्यसंख्या प्रत्येकी १० हजारांवर आहे.

या सहकारी संस्थांनीं सर्वांगीण प्रगति केली असल्याचें या सहामाही अहवालावरून दिसून येतें. या संस्थांची एकूण विक्री त्यामागील सहामाहींत ४०·७९ लक्ष रु. होती. ती सदर सहामाहींत वाढून ४१·३२ लक्ष रुपयांवर गेली. विक्रीच्या बाबतींत पश्चिम रेल्वे सर्वांच्या आघाडीवर असून एकूण विक्रीच्या १/४ हून अधिक विक्री या रेल्वेच्या सहकारी संस्थांनीं केली. या सहकारी संस्थांचें भाग भांडवल ८·६४ लक्ष रुपयांवरून वाढून ९·५० लक्ष रुपयांवर गेलें. याबाबतींतहि पश्चिम रेल्वेच अग्रेसर आहे.

सहकारी संस्थांचा भक्कम पायावर विकास साधण्यासाठीं आणखी उपाय योजण्याची विनंती निरनिराळ्या रेल्वे शासन यंत्रणांस रेल्वे बोर्डानें केली आहे.

### दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

प्रगतीचा तुलनात्मक तक्ता १९४०–१९५८

| वर्ष | शाखा | वसूल भांडवल | गंगाजळी व इतर निधि | ठेवी (लक्ष रु.) | दिलेलीं कर्जे (लक्ष रु.) | गुंतवणूक (लक्ष रु.) | रोकड व बँकांकडील शिल्लक (लक्ष रु.) | खेळतें भांडवल (लक्ष रु.) | नक्त नफा | डिव्हिडंड % करमाफ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४० | २ | १,८१,००० | २९,००० | २७ | १३ | ११ | ५ | ३० | २०,००० | ४ |
| १९४५ | ९ | १२,५०,००० | २,७०,००० | १,२९ | ६० | ६० | २५ | १,५५ | १,७०,००० | ५ |
| १९५० | १८ | १६,००,००० | ४,७१,००० | २,३० | १,२५ | ९० | ३४ | २,७२ | २,३०,००० | ५ |
| १९५५ | २९ | १६,००,००० | ७,७५,००० | ५,०६ | २,३३ | २,३८ | ६१ | ५,८६ | ३,४६,००० | ५ |
| १९५६ | ३४ | १६,००,००० | १०,००,००० | ६,२६ | २,९५ | २,५६ | १,०९ | ७,३२ | ४,०१,००० | ६ |
| १९५७ | ३८ | २२,९४,००० | ११,५०,००० | ७,८५ | ३,७८ | २,५४ | १,८७ | ९,२७ | ४,६९,००० | ६ |
| १९५८ | ४४ | २८,१९,००० | १३,००,००० | १०,५५ | ४,२० | ४,८१ | १,९८ | १२,३१ | ५,५६,००० | ६½ (संकल्पित) |

### चित्रपटाच्या धंद्यांत जपानची प्रगति

दुसऱ्या महायुद्धांत कल्पनातीत हानि झालेली असतांनासुद्धां जपाननें आपली औद्योगिक घडी नव्यानें बसविली आहे. भारताला कर्ज देऊन त्याच्या औद्योगीकरणाला जपान मदत करीत आहेच जपानची ही प्रगति केवळ उद्योगधंद्यापुरतीच मर्यादित नाहीं. चित्रपटासारख्या सांस्कृतिक गणल्या जाणाऱ्या बाबतींतहि गेल्या दहा वर्षांत जपाननें चांगली प्रगति केली आहे. ह्या कालांत जपान चित्रपटांच्या संख्येच्या व दर्जाच्या अशा दोन्ही बाबतींत चांगलाच पुढारला आहे. चित्रपट निर्माण करणारा जगांतील एक मोठा देश म्हणून त्याची ख्याति झाली असून आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवांत जपानी चित्रपट बक्षिसें मिळवत आहेत. जपानी चित्रपटांची निर्यातहि बऱ्यापैकी होऊं लागली आहे. १९५८ सालच्या पहिल्या सात महिन्यांत जपाननें ५० लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे चित्रपट परदेशीं निर्यात केले. ब्रिटन, फ्रान्स, इटली आणि अमेरिका ह्या देशांतून जपानी चित्रपटांचें वितरण व्यापारी पद्धतीनें करण्यांत येत आहे. चित्रपटाच्या निर्मितींतील आणखी एक पुढची पायरी म्हणून जपानमधील निर्माते परदेशांना आस्था वाटेल असे चित्रपट तयार करणार आहेत. व्यंगचित्रें, शास्त्रीय कल्पित कथा, दूरदर्शनाच्या फिल्म्स, इत्यादींची निर्मिती लवकरच करण्यांत येऊं लागेल. जपानमधील सहा प्रमुख चित्रनिर्मात्यांनीं आपली एक संघटना बनविली आहे. जपानी फिल्म्सचा प्रसार परदेशांत अधिक व्हावा म्हणून त्यांनीं आपले विक्रेते–प्रतिनिधी वाढविण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें, परदेशांत–विशेषतः आग्नेय आशिआंत–चित्रपटगृहें बांधण्याच्या योजनाहि आंखण्यांत येत आहेत. उद्योगधंद्यांची यंत्रसामुग्री निर्यात करून ज्याप्रमाणें परदेशी चलन मिळविण्यांत येत आहे, त्याचप्रमाणें चित्रपटांच्या निर्यातीनेंहि ते मिळविण्यांत येणार आहे.

### भुइमुगाच्या तारणाला ४५% मार्जिन हवें

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत सर्व शेड्यूल्ड बँकांना फर्मान काढून, कर्जासाठी तारण म्हणून घेतलेल्या भुइमुगाचे बाबतींत त्यांच्या किंमतीच्या ४५% पेक्षा कमी मार्जिन असतां कामा नये, अशी सूचना केली आहे. भुइमुगाच्या तारणावरील विद्यमान कर्जांसहि ही अट लागूं केली आहे. वनस्पतीचे कारखानदार आणि भुइमुगाच्या निर्गतीसाठी परवाने धारण करणारे ह्यांना दिलेल्या कर्जाच्या मर्यादांना ही अट लागू नाहीं. बँकांनीं भुइमुगाच्या तारणावर एकूण किती कर्ज दिलेलें आहे, त्याचे मासिक आंकडे तयार ठेवून १९५७ अथवा १९५८ च्या तत्सम महिन्यांतील कर्जापेक्षा (ज्या वर्षी ज्यास्त असेल त्यापेक्षा) ज्यास्त कर्ज होणार नाहीं ह्याची दक्षता घ्यावयाची आहे. कर्जदारांना इतर मार्गानें (विनातारण किंवा हुंड्या डिस्कौंट करून) कर्ज देऊन त्यांची सोय करण्यासहि बँकांना बंदी करण्यांत आलेली आहे.

### नियंत्रणापेक्षा आयात जकात श्रेयस्कर

पाकिस्तानचा अध्यक्ष, जनरल अयूबखान, ह्यानें वटहुकूम काढून १५ जिनसांवरील आयात जकात वाढविली आहे. कोकोवर ५०% पासून सिगार्सवरती २००% अशी त्याची व्याप्ति आहे कॉफी, दारू, कापड, कपडे, होजिअरी, वाद्यें, मोटारी, इत्यादींच्या आयातीवर त्याचा परिणाम होईल. नियंत्रणाच्यापेक्षा जकातीच्या मार्गानें अनावश्यक व चैनीच्या जिनसांची आयात कमी करण्याची ही योजना आहे.

### नीरा टिकविण्यासाठीं नवीन पद्धत

भारतांत ताडीपासून गूळ व नीरा बनविण्याच्या उद्योगांत लाखों लोक गुंतलेले आहेत. ह्या धंद्याचा विकास करण्यांत आला तर आणखी कितीतरी लोकांना त्यांत रोजगार मिळूं शकेल. परंतु ताडगुळाच्या धंद्याचा विकास करण्याच्या कामीं एक मोठी अडचण आहे. ताडीच्या झाडापासून उत्पन्न होणारी नीरा टिकवून धरण्याची चांगलीशी पद्धत अद्याप सांपडलेली नाहीं. सध्यां ह्या कामीं चुन्याच्या मळीचा उपयोग करतात; पण तज्ज्ञांच्या मतानें त्या योगानें नीरा सहा तासांपेक्षा अधिक टिकवितां येत नाहीं. शिवाय ह्या पद्धतीनें नीरेमधील सत्वांश व उपयुक्त क्षार बऱ्याच प्रमाणांत नाहींसे होतात. मुंबई राज्यांत दारूबंदी अंमलांत आणली गेल्यापासून नीरा टिकविण्याचा प्रश्न अधिकच तांतडीचा आणि त्याचबरोबर अधिक कठीण झाला. मुंबई सरकारनें नीरा टिकविण्याची विश्वसनीय पद्धत शोधून काढणाऱ्या शास्त्रज्ञाला अगर संशोधन–संस्थेला १०,००० रुपयांचें बक्षीस जाहीर केलें. अलीकडे खादी आणि ग्रामोद्योग कमिशननें ह्या कामासाठी १ लाख रुपयांचें मोठें बक्षीस जाहीर करावें अशी शिफारस केली होती. नीरा टिकविण्याची एक अगदीं सोपी व स्वस्त पद्धत मद्रास विद्यापीठाच्या जीव–रसायन विभागानें शोधून काढली असल्याची वार्ता आहे. विद्यापीठाच्या ह्या विभागाचे प्रमुख डॉ. शर्मा ह्यांनीं संशोधनकार्यांत महत्त्वाची कामगिरी केली आहे. खादी आणि ग्रामोद्योग कमिशननें देशांतील संशोधन संस्थांना हा प्रश्न सोडविण्याची तांतडी समजाविली होती. अखेर मद्रास विद्यापीठानें नीरा टिकविण्याच्या बाबतींत यश मिळविलें आहे. ह्या पद्धतीचा उपयोग करून ती कितपत यशस्वी होत आहे ह्याविषयीं कमिशन व राज्य सरकारें मोठ्या प्रमाणावर प्रयोग करून पाहणार आहेत.

मुंबई स्टॉक एक्सचेंजवर जिच्या शेअर्सची
खरेदी-विक्री होते अशी पहिलीच
महाराष्ट्रीय बँक

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

◆★◆

—भांडवल—

वसूल झालेलें भांडवल (भागापोटीं आगाऊ जमा झालेल्या रकमा धरून) रु.२८,००,०००
गंगाजळी व इतर निधि...रु.१३,००,०००
एकूण खेळतें भांडवल ...रु. बारा कोटींचे वर

जाहीर केलेले डिव्हिडंड
बँकेनें सुरुवातीपासून भागीदारांना नियमित डिव्हिडंड वाटले असून १९५८ सालासाठी द. सा. द. शें. साडेसहा टक्के करमाफ डिव्हिडंड वाटावें अशी संचालक मंडळानें शिफारस केली आहे.

विशाल महाराष्ट्रांत व इतरत्र ४४ शाखा.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणे २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

## बचत करणें, हा आजचा धर्म

### बचत पंधरवड्याचे उद्घाटनप्रसंगीं प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांचें विवेचन

आपल्या खर्चात बचत करणें आणि त्या बचतीची योग्य ती गुंतवणूक करणें हें राष्ट्रीय विकासाचें मर्म आहे. ज्यांची ऐपत आहे अशा मागासलेल्या राष्ट्रांतील सुस्थितींतल्या लोकांनीं बचत करणें हें त्यांचें राष्ट्रीय आणि सामाजिक कर्तव्य तर आहेच; पण त्यांनीं खुशीनें बचत न केल्यानें होणारे परिणाम ध्यानांत घेतां स्वहित व स्वमर्गहित या दृष्टीनेंहि तें त्यांचें कर्तव्य आहे.

राष्ट्रीय विकासयोजनांसाठी लागणाऱ्या खर्चाचा विचार केला तर व्यक्तीच्या हातून होणाऱ्या बचतीचें प्रमाण हें अत्यल्प असतें. पण या अल्प कार्याचें मर्म फार मोठें असल्यानें त्याचा विचार आवश्यक ठरतो व म्हणूनच आपण केलेली बचत व राष्ट्रीय विकासकार्य यांचा संबंध काय, हें नागरिकांना स्पष्टपणें समजणें महत्त्वाचें आहे.

### सामूहिक प्रयत्नांचें महत्त्व

आपलें राष्ट्र गरीब व अप्रगत असून गेल्या १५० वर्षांत ज्यांनीं प्रगतीचें व श्रीमंतीचें टोंक गांठलें आहे अशा राष्ट्रांच्या ओळींत जरी नव्हे तरी त्यांच्याजवळ जाण्याचा आपला प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळांत सुरू होणें अपरिहार्य होतें. प्रगत देशांच्या अंमलाखालीं असतांना आपल्या परागतीची जबाबदारी आपण त्यांच्यावर टाकत असूं. पण आतां स्वतःचा कारभार स्वतःच असतांना हें परावलंबित्व आपोआपच सुटलें व आर्थिक विकासाच्या इतिहासाच्या अभ्यासाची जोड मिळून शेवटीं असा निष्कर्ष निघाला कीं, सामुदायिक रीत्या सरकार व जनता यांचे एकवट प्रयत्न झाल्यासेरीज गरिबींतून आपलें डोकें वर निघणें शक्य नाहीं. याच निष्कर्षांतून विकासाची अव्याहत सुसूत्र अशी योजना निर्माण झाली. पिढ्यान्‌पिढ्या चालणाऱ्या या योजनेचा 'बचत करणें' हा गाभा आहे.

### श्रीमंत कोणास म्हणावें ?

ज्याच्या दारीं हत्ती झुलतो, भालदार–चोपदार ललकारतात, तो श्रीमंत अशी जुन्या काळांतील समजूत आतां नव्या काळांत उरलेली नसून ज्याच्या गांठीं उत्पादनाचीं साधनें अधिक व या साधनांपासून मिळणारें ज्याचें उत्पन्न अधिक तो श्रीमंत, अशी आधुनिक कालांतील श्रीमंतीची अर्थशास्त्रदृष्ट्या होणारी व्याख्या आपण ध्यानांत ठेवावी. अशा श्रीमंतांकडेच संपत्तीचा ओघ येत असतो, व त्या संपत्तीची गुंतवणूक चांगल्या प्रकारानें होत राहिल्यानें राहणीचें मान वाढतें व एकूण सुखसमृद्धि होते. व्यक्तीप्रमाणेंच देशाच्या श्रीमंतीचेंहि हेंच गमक आहे. अशा श्रीमंत देशाचें सरकार समाजस्वास्थ्याची काळजी घेण्यास समर्थ असतें.

आधुनिक काळांतील ही श्रीमंती हा शेवटीं संपत्ति संचयाचा प्रश्न आहे. आज श्रीमंत दिसणाऱ्या राष्ट्रांनीं संपत्तिसंचय केला. आणि तो योग्य प्रकारें उत्पादन–साधनांत गुंतविला व उत्पादन व उत्पन्न या दोन्हींत वाढ केली हें पाहिलें म्हणजे आपल्या सारख्या गरीब राष्ट्राचा प्रश्न तुलनेनें अधिकच बिकट आहे असें दिसेल.

बचत करण्यासाठी उत्पन्न उरूंच शकत नाहीं अशी आपली स्थिति आहे तरीसुद्धां एकदां विकास करावयाचा असें ठरविलें म्हणजे आहे त्या उत्पादनसामुग्रीचा चांगला उपयोग करून त्या सामुग्रींत अधिक भर घालावयाची, खर्च होऊन जाणाऱ्या उपभोग्य वस्तूंचा उपभोग कमी करून बचत साधावयाची व या बचतीची योग्य गुंतवणूक करावयाची हीं आपल्या राष्ट्रीय विकास योजनेचीं मुख्य अंगें ठरतात.

### संपत्तिसंचयाचे दोन मार्ग

कोणत्याहि सरकारजवळ राष्ट्रीय विकासकार्यासाठी आवश्यक असलेला संपत्तिसंचय दोन मार्गांनीं करतां येतो. एक करूपानें लोकांवर सक्तीची बचत लादून वा जनतेनें आपखुशीनें बचत करून दिलेल्या पैशांतून. परदेशांच्या मदतीचा परावलंबित्वाचा व बेभरंवशाचा मार्ग विचारांत न घेतलेलाच बरा. तुटीचा अर्थ-संकल्प हा एक मार्ग आहे. जादा नोटा छापून पैसा उपलब्ध होतो असें सकृत्दर्शनीं दिसलें तरी किमती वाढून किंवा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर बसवून उपाययोजना केल्याशिवाय हा मार्ग यशस्वी होत नाहीं.

दुसरा मार्ग आपखुषीच्या बचतीचा. या प्रकारच्या बचतीचा मार्ग यशस्वी ठरविणें हें सामाजिक संतोषाच्या दृष्टीनें व व्यक्ति-हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे. आपखुषीनें होणाऱ्या बचतीचें प्रमाण जितकें जास्त, तितकें सरकारी सक्तीचें प्रमाण कमी व जितकी सक्ति कमी तितकें तें समाजहितदृष्ट्या इष्ट.

### बचतयोजनेचें मर्म

सरकार जेव्हां संपत्तिसंचयासाठी कर, इत्यादि प्रकारच्या योजना आखतें, त्यावेळीं आर्थिक व्यवहार, व्यक्ति व उत्पन्न या प्रकारचीं स्थूल वर्गीकरणें करतें. वर्गीकरणाचें स्वरूप सबघोडे बारा टक्के असें राहतें; त्यांत व्यक्तिव्यक्तींच्या परिस्थितीचा किंवा पात्रापात्रतेचा स्वतंत्र विचार नसतो. त्यामुळें व्यक्ति व परिस्थिति यांचा मेळ बसतोच असें नाहीं. यासाठींच खुषीच्या बचतीचा मार्ग स्वीकारला पाहिजे.

सरकारी सक्तीचा व्यक्तिगत परिस्थितीशीं मेळ बसत नसल्यानें होणाऱ्या अन्यायांतून समाजांत सुस्थितींत असलेल्या लोकांबद्दल असंतोष पसरतो व हेवा वाढूं लागतो. सामाजिक शांततेला ही स्थिति अपायकारक ठरते. म्हणूनच सुस्थितींतील लोकांनीं स्वतःबद्दलचें एक कर्तव्य म्हणून तरी आपखुषीनें बचतयोजनेंत भाग घेतला पाहिजे.

सरकारवर कितीहि टीका केली तरी शेवटीं आपण स्वतंत्र आहोंत, व आपल्या आणि आपल्या भावी पिढीच्या हितासाठी आपण त्याग केला पाहिजे हें शिल्लक उरतेंच. आपल्या हिंदु तत्त्वज्ञानांत प्रत्येक व्यक्तीनें आपलें धर्माचरण पार पाडलें म्हणजे समाज सुस्थितींत राहतो, असें सांगितलें आहे. त्याच न्यायानें चैनींत किंवा इतर अनावश्यक खर्चांत काटकसर करून बचत करणें हा आजचा धर्म आहे व तो प्रत्येकानें पार पाडला तर राष्ट्रीय विकासाला फार मोठें साहाय्य होईल असें वाटतें.

—केसरी, १५-२-५९

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २

### १२ लक्ष, ५९ हजार रु. नफा; १२½% करमाफ डिव्हिडंड

दि. ३०–६–१९५८ अखेर संपलेल्या वर्षीं उत्पादनाकरितां लागणारा खर्च व मॅनेजमेंटचा खर्च आणि रु. ११,६९,०९९ ची तरतूद घसारा डेव्हलपमेंट, रिबेट, सेवक वर्गास बोनस व ग्रॅच्युइटी आणि संपत्ति–कर यांसाठी केल्यानंतर अहवालाचे वर्षीं निव्वळ नफा रु. १२,५९,२७८–७९ इतका झाला आहे. जनरल रिझर्व्हमध्यें ७ लक्ष रु. व डिव्हिडंड ई. फंडांत २ लक्ष रु. घातल्यावर पुढील वांटणीसाठी रु. ३,९५,५०७–७८ इतका नफा शिल्लक राहतो. त्यांतून ऑर्डिनरी भागांवर १२½% करमाफ डिव्हिडंडसाठी २,९६,२५० रु. चा विनियोग केला जाईल.




## तुम्ही कोणासाठीं पैसे मिळवितां?...

तुम्हांला वाटतं बायकामुलांसाठीं. पण प्रत्यक्ष काय करतां हें बघितलं काय? पगार झाल्यावर तुम्ही आधीं वाणी, दूधवाला, डॉक्टर, घरवाला, कापडवाला यांची बिलं चुकतीं करतां आणि मग उरलेले पैसे मुलाबाळांसाठीं. उद्यां तुम्ही नसलांत तरी ह्या सर्वांना हें पैसे द्यावे लागणारच. फार तर थोडे कमी, एवढेंच. त्यासाठीं आधीं कांहीं विशिष्ट रक्कम विम्यांत गुंतविलीत तर आपला व कुटुंबाचा भावी काल सुरक्षित होईल.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

PRATIBHA/LIC 6


## अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें — मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, १० शुक्रवार पेठ, पुणें —



# किर्लोस्कर

## इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकरित्या काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी; द. सातारा**

## बँक नोकरांच्या मागण्या

### अवार्डच्या मुदतवाढीस विरोध

ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनची दहावी वार्षिक परिषद बंगलोर येथें पांच दिवस भरली होती. परिषदेला भारतांतील सर्व भागांतून ५२५ प्रतिनिधी हजर होते. ३१ मार्च रोजीं संपुष्टांत येणाऱ्या बँक अवार्डची मुदत वाढविण्याच्या प्रयत्नांस कसून विरोध करण्यांत यावा, असें परिषदेनें ठरविलें. असोसिएशननें व तिच्या घटक संस्थांनीं बँकांना चालू अवार्ड संपल्याच्या नोटिसा द्याव्या. नोटिशीची तारीख मध्यवर्ती कमिटी ठरवील, असेंहि निश्चित करण्यांत आलें. नोकरीच्या अटी सुधारण्याच्या मागणीस सर्व नोकरांनीं एकजुटीनें पाठिंबा द्यावा, बँकांच्या व्यवस्थापकांनीं असोसिएशनच्या प्रतिनिधींबरोबर बसून वाद सलोख्यानें मिटवावा, अशा उभयपक्षी वाटाघाटीच असोसिएशनला हव्यात, त्या वाटाघाटी सरकारनें वजन खर्चून घडवून आणाव्या, तें शक्य झालें नाहीं तर बँकर्स, नोकरांची असोसिएशन व सरकार अशी तिघांची बैठक भरविली जावी, असोसिएशनला सोडून इतर कोणाशींहि बँकांनीं व सरकारनें करार केला तर तो असोसिएशन, तिच्या घटक संस्था व बँक नोकर मानणार नाहींत, अशा अर्थाचे ठराव परिषदेनें मंजूर केले. बोनस, बँकिंगच्या व्यवसायाचें राष्ट्रीयीकरण, सरकारचें कामगारविषयक धोरण, ऑल-इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशनला मान्यता, इत्यादि विषयांवरहि ठराव करण्यांत आले.

शास्त्री ट्रायब्यूनलकडे तंटा निवाड्यासाठी १९५२ सालीं पाठविण्यांत आला, तेव्हांपासून बँकिंगच्या व्यवसायानें सर्वांगीण प्रगति केली आहे; व्यवसायाचें भवितव्य वाढता धंदा, ठेवींत भर, नफ्यांत वाढ, इत्यादींवरून उज्ज्वल असल्याचें दिसून येतें. बँक नोकरांनीं कसून केलेलें काम व दिलेलें सहकार्य, ह्यामुळेंच बँकिंगची सतत प्रगति झाली आहे. बँक नोकरांवर पांच वर्षे अवार्ड लादण्यांत आले आहे. ज्या परिस्थितींत नोकरांचे पगार व इतर गोष्टी १९५३ मध्यें ठरविण्यांत आल्या, ती परिस्थिति पार बदलली आहे; तेव्हां वेतनश्रेणी व इतर बाबी ह्यांतहि सुधारणा व्हायलाच हवी, अशी परिषदेची मागणी आहे.

स्टेट असोसिएटेड बँकांचें स्टेट बँकेंत विलिनीकरण करण्यांत यावें, सर्व लहान बँकांचें एकत्रीकरण करण्यांत यावें, सर्व बँका (स्टेट बँका व सहकारी बँकांसुद्धां) मध्यवर्ती इंडस्ट्रिअल डिस्प्यूटसच्या कक्षेंत आणण्यांत याव्या, म्हणजे इतर बँकांतील नोकरांच्या प्रमाणें त्यांनाहि सवलती मिळतील, बँकांच्या डायरेक्टर बोर्डावर नोकरांचे प्रतिनिधी घेण्यांत यावेत (कामगारांचा व्यवस्थेंत हात असावा हें तत्त्व सरकारनें मान्य केलेलें आहे), अशाहि अर्थाचे ठराव झाले आहेत.

**ओरिसामधील लोखंडाच्या खाणी**— ओरिसामधील लोखंडाच्या खाणींची प्राथमिक पहाणी करण्यासाठी जपानमधून १० भूगर्भशास्त्रज्ञांची एक तुकडी आली आहे. ही तुकडी दोन महिनेपर्यंत भारतांत आपलें काम करणार आहे. १९६२ सालअखेर काम संपेल व १९६६ पासून खाणी चालू होतील असा अंदाज करण्यांत आला आहे.

### नोंदलेल्या मोटार गाड्या
( आंकडे हजारांचे )

| | मोटार गाड्या | | भाड्याच्या गाड्या | | एकूण | | प्रत्येक १००० लोकसंख्येशीं प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९५५ | १९५६ | १९५५ | १९५६ | १९५५ | १९५६ | १९५६ |
| यु स्टेट्स | ५२,१७३ | ५४,३३२ | १०,५८७ | १०,८८० | ६२,७६० | ६५,२१३ | ३८७ |
| ग्रेट ब्रिटन | ३,६०९ | ३,९८१ | १,२३९ | १,३०२ | ४,८४८ | ५,२८३ | १०३ |
| कॅनडा | २,९२९ | ३,१७३ | ९८९ | १,०४६ | ३,९१८ | ४,२१९ | २६२ |
| फ्रान्स | २,५२२ | ३,५५१ | १,०९३ | १,३१८ | ३,६१५ | ४,६६९ | १०७ |
| रशिया | ४०० | ४०० | २,५०० | ३,००० | २,९०० | ३,४०० | १७ |
| जर्मन फे. रिपब्लिक | १,७८९ | २,२०४ | ७८८ | ६९८ | २,५७६ | २,९०२ | ५६ |
| ऑस्ट्रेलिया | १,४२० | १,५२५ | ६६५ | ७०९ | २,०८५ | २,२३५ | २३७ |
| इटली | ८७९ | १,०४० | ३७५ | ३९४ | १,२५४ | १,४३४ | ३० |
| जपान | १५३ | १५७ | ७४३ | ७६२ | ८९६ | ९१९ | १० |
| द. आफ्रिका | ६०९ | ६४२ | १८५ | २०८ | ७९४ | ८५० | ६१ |
| ब्राझिल | ३०३ | ३७७ | ३२१ | ३७८ | ६२४ | ७५५ | १३ |
| बेल्जम | ४५९ | ५१८ | २०४ | २१० | ६६३ | ७२८ | ८२ |
| स्वीडन | ५९० | ७२३ | ११७ | ११७ | ७०७ | ८४० | ११५ |
| न्यूझीलंड | ३९४ | ४२० | १६७ | १७० | ५६१ | ५९० | २७० |
| मेक्सिको | २६५ | २७० | २२० | २३० | ४८५ | ५०० | १६ |
| अर्जेंटिना | ३२९ | ३३७ | १७० | १७८ | ४९९ | ५१५ | २६ |
| नेदरलंड | २६८ | ३२७ | ११४ | १३० | ३८२ | ४५७ | ४२ |
| भारत | १७८ | १८० | १४६ | १५० | ३२४ | ३३० | १ |
| इतर देश | ३,७२४ | ४,३०० | २,३४४ | २,७२० | ६,०६९ | ७,०१९ | ५ |
| जग | ७२,९९३ | ७८,२५८ | २२,९६७ | २४,६०० | ९५,९६० | १०२,८५८ | ३९ |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.